श्री. प्रदीप भिमराव दुर्गे, उप संचालक, देवगिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर यांना पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**

**शासन आदेश क्र.व्यशिअ-२०२५/प्र.क्र.३४७/व्यशि-१**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मुख्य इमारत, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२.

**दिनांक : ०१ एप्रिल, २०२६.**

**संदर्भ:-** (१) महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियम) नियम, २०२१,

(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही-२००२/प्र.क्र.२/१२, दि.०६ जून, २००२.

(३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-२०१५/ व्हीआयपी २१०/प्र.क्र.४१२/का.-१२, दि. २१/०८/२०१५

(४ )सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.३१०/का.- १२, दि.१५/१२/२०१७

(५) सन २०२१-२२ निवडसुची करिता दि. २६/०५/२०२२ रोजी आयोजित विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

(६) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: जेष्ठता-२०२२/प्र.क्र.३१/व्यशि-१, दि. ०९/०६/२०२२.

(७) कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन आदेश क्र.२०२२/प्र.क्र.७०/व्यशि-१, दि. २९/०९/२०२२.

(८) कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन आदेश क्रमांक:व्यशिअ-२०१५/प्र.क्र.३७९/व्यशि-१, दि. २३/०२/२०२३.

(९) कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन आदेश क्रमांक:व्यशिअ-२०१५/प्र.क्र.२०९/व्यशि-१, दि. २६/०४/२०२३.

(१०) कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन आदेश क्रमांक:पदोन्न-२०२३/प्र.क्र.३७५/व्यशि-१, दि. २१/११/२०२३.

(११) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.०३/आस्था-१/मा.दि.दुर्गे/२०२५/३३६, दि.११/०७/२०२५

**प्रस्तावना-**

संदर्भ क्र. (७) नुसार सन २०२१-२२ च्या नियमित निवडसूचीतून उपसंचालक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ या संवर्गात तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नतीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. सदरील पदोन्नतीकरीता विचारात घेण्यात आलेल्या प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण /जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी / सचिव, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ,

गट-अ (तांत्रिक) (वरिष्ठ) (राजपत्रित), महाराष्ट्र शिक्षण सेवा या संवर्गाच्या दि.०१/०१/२०२१ च्या सेवाजेष्ठता यादीनुसार श्री. प्रदीप भिमराव दुर्गे यांचे सेवा जेष्ठता क्र.२१ वर नाव असल्याने ते पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात होते. तथापि, श्री. दुर्गे यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ व १२ अन्वये एकूण २ प्रकरणी विभागीय चौकशी सुरु करण्यात आली होती. त्यामुळे दि. २६/०५/२०२२ रोजी आयोजित विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत संदर्भ क्र. (४) येथील शासन निर्णय दि.१५/१२/२०१७ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील श्री. दुर्गे यांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी तपासण्यात आली होती व प्रकरण मोहोर बंद पाकिटात ठेवण्यात आले होते. त्यामुळे श्री. दुर्गे यांच्यापेक्षा सेवा कनिष्ठ असलेले श्री. रमाकांत बाबूराव भावसार, गट अ (तांत्रिक) यांना (सेवा जेष्ठता क्र.२२) उपसंचालक गट-अ (तांत्रिक) (वरिष्ठ) या पदावर पदोन्नती देण्यात आलेली असुन श्री.भावसार हे सदर पदावर दि.०३/१०/२०२२ रोजी रुजू झाले आहेत.

२) तद्नंतर श्री. दुर्गे यांच्याविरुध्द सुरु असलेल्या दोन्ही विभागीय चौकशीतून त्यांची संदर्भ क्र. (६) व (७) येथील दि. २३/०२/२०२३ व दि. २६/०१/२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये निर्दोष मुक्तता करण्यात आलेली आहे. त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१५/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री. दुर्गे यांचे मोहोरबंद ठेवण्यात आलेले पाकीट उघडण्यात आले असून, ते पदोन्नतीसाठी सेवा ज्येष्ठतेनुसार पात्र असल्याची शिफारस विभागीय पदोन्नती समितीने विवरणपत्रामध्ये केलेली असल्यामुळे त्यांना संदर्भ क्र. (१०) येथील दि. २१/११/२०२३ रोजीच्या आदेशानुसार गट-अ (तांत्रिक) महाराष्ट्र शिक्षण सेवा संवर्गातून उपसंचालक गट-अ (तांत्रिक) (वरिष्ठ) या पदावर सन २०२२-२३ च्या नियमित निवडसूचीतून सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात आलेली आहे.

३) सन २०२१-२२ च्या निवडसूचीत श्री. प्रदीप दुर्गे यांना सेवाकनिष्ठ असलेले श्री. रमाकांत बाबुराव भावसार यांना पदोन्नती दिल्यामुळे श्री.दुर्गे यांना श्री. भावसार यांचा उप संचालक, गट-अ (तांत्रिक), महाराष्ट्र शिक्षण सेवा या पदावर देण्यात आलेल्या पदोन्नतीचा दिनांक ०३/१०/२०२२ हा मानीव दिनांक देण्याबाबत प्रस्ताव संदर्भ क्र. (११) येथील दि.०६/०६/२००२ नुसार शासनास सादर करण्यात आलेला होता. सबब, सदर बाब विचारात घेऊन श्री.दुर्गे यांना मानीव दिनांक देण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय :-</u>**

प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण/ जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी / सचिव, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, गट-अ (तांत्रिक) (वरिष्ठ) (राजपत्रित), महाराष्ट्र शिक्षण सेवा या संवर्गाच्या दि.०१/०१/२०२१ च्या सेवाजेष्ठता यादीनुसार श्री. प्रदीप भिमराव दुर्गे हे गट-अ (तांत्रिक) या संवर्गातून उपसंचालक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (तांत्रिक) (वरिष्ठ) या संवर्गात सन २०२१-२२ च्या निवडसूचीतून पदोन्नतीसाठी पात्र होत असल्याने त्यांना

उपसंचालक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (तांत्रिक) (वरिष्ठ) या पदावर पदोन्नतीचा दिनांक ०३/१०/२०२२ हा मानीव दिनांक म्हणून देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. श्री.दुर्गे यांना उपसंचालक महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (तांत्रिक) (वरिष्ठ) या पदावर दिलेला मानीव दिनांक हा सेवाज्येष्ठतेसाठी ग्राह्य धरण्यात यावा. श्री. दुर्गे यांची काल्पनिक वेतननिश्चिती उपसंचालक पदावर मंजूर केलेल्या दि.०३/१०/२०२२ या मानीव दिनांकापासून करुन उपसंचालक पदावरील प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापर्यंत त्यांची काल्पनिक वेतननिश्चिती करण्यात यावी. तथापि, सदर काल्पनिक वेतननिश्चितीच्या अनुषंगाने वेतन व भत्यांची थकबाकी श्री.दुर्गे यांना अनुज्ञेय राहणार नाही.

३. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, का.१२ (सेवा-३) व वित्त विभाग (सेवा-३) यांनी दिलेल्या सहमतीनुसार नुसार तसेच संदर्भ क्र. (३) येथील दि.२१/०८/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांच्या मान्यतेने हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०११४५०१२२००३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VINOD VISHWANATH CHAUDHARI

Digitally signed by VINOD VISHWANATH CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=D3A61CF46D54B669BA9F5D9BA4F32DD8ED54A7EA64E7D1483AE325DB5B8A3005, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8933E15B4DBF1243939DE4EFCC94AD1431E1DE56B3F2F32F01837980F363FA8D, cn=VINOD VISHWANATH CHAUDHARI
Date: 2026.04.01 17:25:53 +05'30'

**( विनोद चौधरी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

(१) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
(२) अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
(३) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
(४) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
(५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राद्वारे)
(६) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
(७) सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नागपूर/ अमरावती/ छत्रपती संभाजीनगर/ नाशिक/ मुंबई /पुणे.
(८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
(९) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
(१०) जिल्हा कोषागार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
(११) संबंधित अधिकारी (संचालनालयामार्फत)
(१२) संबंधित कार्यालय/ संस्था (संचालनालयामार्फत)
(१३) निवडनस्ती (व्यशि-१)